औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. ८. १. ९७ रोजी झालेल्या १०३ च्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. किशनचंद तनवाणी | सभापती |
| २. मा. श्री. एच. के. जावळे | मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ |
| ३. मा. श्री. गणेश माहोरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४. मा. श्री. सुरेंद्र कुलकर्णी | -"- |
| ५. मा. श्री. सुरेश जैन | -"- |
| ६. मा. श्री. पुंडलीकराव शिंदे | -"- |
| ७. मा. प्रा. श्री. नंदु कुलकर्णी | -"- |
| ८. मा. श्री. अशोक लोमटे | -"- |
| ९. मा. श्री. नारायण जाधव | -"- |
| १०. मा. श्री. चौधरी [उपसंचालक नगररचना] | -"- |
| ११. मा. श्रीमती कमल तुल्ले | सदस्या औरंगाबाद मंडळ |
| १२. मा. श्री. कैलासचंद सेठी | सदस्य औरंगाबाद मंडळ. |

वंदेमातरम या राष्ट्रीय गीतानंतर मंडळाच्या बैठकीस सुरुवात झाली. सध्या जि. प. /पं. स. च्या निवडणुकीची आचारसंहीता असल्यामुळे मंडळाची ही १०३ वी बैठक, आचारसंहीतेच्या काळात मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे परवानगीने घेण्यांत येत आहे. तथापी आचारसंहीतेच्या काळात सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयास प्रसिध्दी देऊ नये असे मुख्य अधिकारी यांनी सुचविले व त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

दिनांक २९. १०. ९६ रोजी पार पडलेल्या मंडळाच्या १०२ बैठकीच्या कार्यवृत्तांतावर/निर्णयावर केलेल्या कार्यवाहीबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली व सदर १०२ च्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयावर मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या अनुषंगीक कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सादर केला. मंडळाच्या १०२ च्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करतांना मंडळाच्या मा. सभापती यांनी व मा. सदस्यांनी खालील गोष्टींचा पुनश्च:उहापोह केला.

मंडळाच्या वसाहतीत होत असलेल्या अतिक्रमणाबाबत व तसेच अनाधिकृत बांधकामाबाबत मंडळाचे सभापती श्री. तनवाणीसाहेब, मा. सदस्य श्री. शिंदे, प्रा. नंदु कुलकर्णी, सुरेश जैन व अशोक लोमटे यांनी सूचना केली की, मंडळाच्या कोणत्याही वसाहतीत मोकळ्या जागेवर, ड्रेनेज लाईनवर, पाण्याच्या लाईनवर अतिक्रमण किंवा अनाधिकृत बांधकामे होऊ देऊ नये. अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यासाठी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सर्व

वसाहतीनिहाय एक ठोस कार्यक्रम आखून पुढील कार्यवाही करावी.

मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, अतिक्रमणे किंवा अनाधिकृत बांधकाम यावर लक्ष ठेवण्याची ज्या कोणत्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची जबाबदारी येते, त्यास याबाबतीत जबाबदार धरावे व त्यांचेकडून अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे रोकण्यास कसूर होत असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी, किंवा भाडेवसूलीकारांनी/संबंधीत अधिकाऱ्यांने अशा अनाधिकृत बांधकामाबाबत कार्यालयास अहवाल सादर केला नाही किंवा दुर्लक्ष केले तर अशा कर्मचाऱ्यावर तात्काळ कार्यवाही करावी.

वरील सूचना ऐकल्यानंतर मुख्य अधिकारी यांनी मंडळाच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळाकडे अतिक्रमणे रोखण्यासाठी वा हटविण्यासाठी खास कर्मचारी वर्ग नाही हे काम पोलीस मदत उपलब्ध झाल्याशिवाय पार पाडणे शक्य होत नाही. तसेच या कामासाठी रोजंदारीवरील मंजूर देखील काम करण्यासाठी पुढे येत नाही. अशा स्थितीत अतिक्रमण काढण्यास अडचणी येत आहेत तसेच म्हाडा कायद्याच्या तरतुदीनुसार अतिक्रमणाविरूद्ध--- अनाधिकृत बांधकामाविरूद्ध सक्षम प्राधिकारी म्हाडा मुंबई यांचेकडे संबंधीत व्यक्तीविरूद्ध प्रकरणे दाखल करण्यांत येत आहेत. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की, अतिक्रमणाबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना सूचना देण्यांत येतील.

मा. सभापती यांनी मुद्दा उपस्थित केला की, बऱ्याच वसाहतीत मंडळाचे गाळेधारक हे गाळ्याचा वापर अनिवासी कारणासाठी करित आहेत. ज्यात प्रामुख्याने रोडवरील व मोक्याच्याठिकाणी असणाऱ्या गाळ्यांचा समावेश आहेत. याबाबत अधिकारी काय कार्यवाही करीत आहेत असे सभापती यांनी मंडळाचे मिळकत व्यवस्थापक यांना विचारणा केली. तसेच विविध वसाहतीतील अनधिकृत बांधकामे केलेल्या गाळेधारकांना, असे बांधकामे मंडळाकडून नियमित करून घेण्यासाठी मि. व्य. यांनी आतापर्यन्त किती पत्रे पाठविले आहेत व मंडळाच्या मागील बैठकीत याबाबतीत झालेल्या चर्चेनुसार मि. व्य. यांनी काय कार्यवाही केली याबाबतही विचारणा केली.

वरील बाबतीत मि. व्य. यांनी खुलासा केला की, ३ गाळेधारकांना अनाधिकृत बांधकामे नियमित करून घेणेसाठी नोटीसा पाठविल्या होत्या. त्यापैकी फक्त एका गाळेधारकाने मंडळाकडे पैसे भरून अनाधिकृत बांधकाम नियमित करून घेतले आहे.

अनाधिकृत बांधकामाबाबत उपसंचालक नगररचना व मंडळाचे सदस्य यांनी व मंडळाचे इतर मा. सदस्यांनी मत व्यक्त केले की, ४० फुट किंवा त्याही पेक्षा जास्त असलेल्या मंडळाच्या वसाहतीलगच्या व वसाहतीमधील रोडवरील निवासी गाळ्याचा वापर गाळेधारक अनिवासी करणासाठी

करीत असतील तर असे अनाधिकृत बांधकामे गाळेधारक आवश्यक ते दंड भरुन नियमित करुन घेऊ शकतील तथापी अशा बांधकामाची प्रथमत: वर्गवारी निश्चीत करावी म्हणजे अनाधिकृत बांधकामे,

अ] गाळयांच्या प्लॉटच्या सिमेत आहेत काय ?

ब] गाळयालगत /इमारती शेजारी मोकळी जागा आहे काय ? इत्यादी.

हे निश्चीती केल्यानंतर त्यांची वर्गवारी ठरवावी तसेच अशी अनधिकृत बांधकामे वसाहतीमधील/वसाहतीलगतच्या ड्रेनेज लाईनवर, रस्त्यावर पाणीपुरवठा लाईनवर नसतील तर व यां नागरी सुविधेस बाधा आणीत नसतील तर अशी अनाधिकृत बांधकामे[गाळेधारकांच्या गाळयांच्या प्लॉटच्या सिमेतील/नियमीत करण्याची कार्यवाही करावी.

मा. सभापती यांनी मंडळाची थकबाकी वसुलीची काय स्थिती आहे. व तसेच सरचार्जच्या वसुलीबाबत मंडळाच्या वसाहतीनिहाय माहिती मंडळा पुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यात काय प्रगती आहे. याबाबत विचारणा केली. त्यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा सादर केला की, भरीव वसुली होणेबाबत भाडेवसुलीकारांना ताकीद देण्यात आलेली आहे. सरचार्ज वसुलाबाबत सर्व वसाहतीमधील माहिती तयार करण्याचे काम लवकरच पुर्ण करण्यांत येईल. असे मि. व्य. यांनी सांगितले. निवासी लेखा अधिकारी यांचे मध्यंतरीच्या काळात मंडळाच्या लेख्यांच्या तपासणीचे काम चालु होते. त्यामुळे सर्व कर्मचारी वर्ग/अधिकारी वर्ग त्यात गुंतला होता. म्हणून सरचार्जची संपूर्ण माहिती मंडळापुढे ठेवता आली नाही. असेही मि. व्य. यांनी बैठकीत नमुद केले. तथापी मंडळाच्या पुढील बैठकीत सरचार्ज वसुलीबाबतची /परिपुर्ण माहिती सादर करण्यात येईल असे मि. व्य. यांनी बैठकीत सांगितले. मि. व्य. यांनी सरचार्जबाबत सर्वच कॉलनीतील [८५ कॉलनीतील] माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यासाठी तयार ठेवावी म्हणून मुख्य अधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांना बैठकीत सुचना दिल्या.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर विचारणा झाल्यावरुन मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, म्हाडाच्या अल्प उत्पन्न गटाच्या विविध वसाहतीतील गाळयांमधील गाळेधारक हे चहापान, पानबिडी, शिवणी शिलाई काम इ. छोटया प्रकारचे घरगुती व्यवसायअंतर्गत वरील प्रकारचा व्यवसाय परवानगी घेऊन करु शकतील अशा प्रकारची मंजूरी म्हाडाने एका परिपत्रकान्वये दिलेली आहे. अशा परिपत्रकाची प्रत मुख्य अधिकारी

यांनी मंडळाचे मा. सभापती व सर्व मा. सदस्यांना दिली. तसेच मंडळासाठी नेमावयाच्या वकीलांच्या पॅनेलविषयी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांना दिली.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाच्या दि. २९. १०. ९६ रोजी पार पडलेल्या १०२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर चर्चा होऊन झालेल्या चर्चेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन तसेच सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयावर पुढील योग्य ती कार्यवाही अधिकाऱ्यांनी करावी म्हणून मंडळाच्या १०२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत एकमताने कायम करण्यात आला.

ठराव क्र. ६२०

मंडळाच्या दि. २९. १०. ९६ रोजी झालेल्या १०२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर चर्चा होऊन झालेल्या चर्चेवर/निर्णयावर कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन मंडळाच्या १०२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: सन १९९६.९७ चे सुधारीत अंदाजपत्रक व
सन ९७.९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

....

मुख्य अधिकारी यांनी मंडळाचे सन १९९६.९७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९७.९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर केले व या विषयाची सविस्तर बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविली. मुख्य अधिकारी यांनी मंडळास सांगितले की, सन १९९६.९७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९७.९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर ते प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविले जाते. सुधारीत व अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे (त्या सोबत जोडलेल्या विवरणपत्राचे) मंडळाच्या मा. सदस्यांनी अवलोकन केले व त्यावर चर्चा केली.

वरील विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य मा. प्रा. श्री. नंदु कुलकर्णी यांनी मुद्दा उपस्थित केला की, वसाहतीतील सॅनीटेशन बाबत म्हाडा कायद्यात तरतुद आहे. तथापी यासाठी या अंदाजपत्रकात तरतुद केलेली दिसत नाही. तसेच म्हाळंजा नांदेड येथील मंडळाच्या वसाहतीतील साफसफाईच्या कामाची व्यवस्था करण्यांत यावी असे मा. सदस्य यांनी मत व्यक्त केले.

वरील बाबतीत मु. ले. अ. यांनी खुलासा केला की, वसाहतीतील दररोजच्या साफसफाईच्या कामासाठीच्या खर्चाची तरतूद ही गाळ्यांच्या मासिक हप्त्यात नसते. तथापी त्यासाठी वेगळे सेवाशुल्कापोटी शुल्क वसूल केले जाते. तसेच गाळ्यांचे वाटप झाल्यानंतर म्हाडा कायद्यातील तरतुदीनुसार गाळेधारकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन [नोंदणीकृत] करून त्या त्या वसाहतीमधील सुविधांची देखभाल त्यांचे सोसायटीनेच करावयाची असते. गाळेधारक अशा सहकारी संस्था स्थापन करण्यास पुढे येत नाहीत. किंवा तयार होत नाहीत. त्यामुळे वसाहतीतील सुविधांची देखभाल करण्याची म्हाडाची जबाबदारीही राहात नाही अशा प्रकारची स्पष्ट तरतूद महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायदा १९७६ मध्ये अंतर्भूत आहे.

यावर मा. सभापती औरंगाबादमंडळ यांनी असे मत प्रतिपादन केले की, ज्या ज्या वसाहतीमधील गाळेधारकांकडून त्यांना गाळे वाटप करतांना त्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन शोअर्सपोटी त्यांचेकडून मंडळाने पैसे वसूल केलेले आहेत, त्या त्या वसाहतीतील गाळेधारकांनी सहकारी संस्था स्थापन करावी/नोंदणीकृत करावी म्हणून मंडळातर्फे संबंधीत गाळेधारकांना मार्गदर्शन करावे वत्यांनी सहकारी संस्था स्थापन करून वसाहतीतील सुविधांची देखभाल करण्यासाठी पुढे यावे म्हणून मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करावा अशा सुचना मा. सभापती यांनी बैठकीत दिल्या म्हणजे गाळेधारकांची सहकारी संस्था स्थापन झाल्यानंतर वसाहतीतील सुविधा देखभालीसाठी अशा संस्थेकडे देणे शक्य होईल असे मत मा. सभापती/औ. मं. यांनी प्रतिपादन केले.

मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, पुणे मंडळ व इतर मंडळात उप-समाज विकास अधिकाऱ्याचे पद प्राधिकरणाने मंजूर केले आहेत व अशा पदावर अधिकाऱ्यांची नेमणूकही केली आहे. औरंगाबाद मंडळातही उप समाज विकास अधिकाऱ्याची पदे मंजूर करणेबाबत व ते भरणेबाबत रितसर प्रस्ताव मु. अ. यांनी प्राधिकरणाकडे पाठवावा अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर औरंगाबाद मंडळाचे सन ९६.९७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन ९७.९८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक हे मंडळाने एकमताने मंजूर केले व त्यावर मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२१

सन ९६.९७ या आर्थिक वर्षाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन ९७.९८ या वर्षाच्या प्रस्तावित अंदाजपत्रकास मंडळाने मान्यता दिली व पुढील मंजूरीसाठी ते प्राधिकरणास पाठवावे असे ठरले.

विषय क्र. ३:

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जीनगर कौठा नांदेड गट क्र.८० या जमिनीवरील अल्प उत्पन्न गट अंतर्गत ६० गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

---

सदर विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता औ.मं. यांनी वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, कौठा नांदेड येथील ६० गाळ्यांच्या बांधकामासाठी खालील तीन निविदा प्राप्त झाल्यात.

| | |
|---|---|
| १] मे.गंजेवार कन्स्ट्रक्शन कं.नांदेड | ६१% जादा |
| २] मे.लुतफुल्ला नांदेड | ६०% जादा निम्नतम |
| ३] मे.राहूल कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | ६५% जादा |

त्यापैकी मे.लुत्फुल्ला नांदेड यांनी निविदा ६०% जादा [निम्नतम] प्राप्त झालेली निविदा मंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे. सदर कामाचे निविदेतील अंदाजपत्रक सा.बां. विभागाचे वर्ष ९२.९३ या दरसुचीनुसार आहे. सदर कामाची निम्नतम दराची निविदा म्हणजे ६०% जास्त सा.बां. विभागाचे प्रचलीत दरसुची वर्षे ९६.९७ शी तुलना केल्यास सदरची निम्नतम निविदा प्रचलीत दरसुचीवर ५.३६% जास्त येते. सदर कामासाठी निम्नतम दराच्या निविदेतील किंमतीनुसार प्रशासकीय मान्यतेची एकुण प्रकल्प किंमत १०% पेक्षा जास्त होत असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यांत येईल.

यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री.सुरेश जैन यांनी विचारले की, सदरची योजना प्राधिकरणाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी कधी पाठविली होती.

यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, एप्रिल १९९४ मध्ये प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यांत आला होता.

यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री.माहोरे यांनी प्रतिपादन केले की, गाळ्यांच्या किंमती या १०% पेक्षा जास्त वाढु नये असा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. परंतु कौठा नांदेड येथील ६० अल्प उत्पन्न गट गाळ्यांसाठी प्राप्त झालेले निम्नतम दराच्या निविदेमुळे गाळ्यांच्या किंमती जास्त वाढत आहे.

यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, सदर योजनेचे इस्टीमेट ९२.९३ च्या सा. बां. विभागाच्या दरसुचीवर आधारीत आहे. चालु दरसुचीनुसार ठेकेदाराने आपला दर दिला आहे.

यावर मंडळाचे सभापतींनी संबंधीत ठेकेदारास मंडळासमोर वाटाघाटी करिता बोलविण्यांत यावे असे सुचविले. त्यानुसार सदर ठेकेदार मे. लुत्फुल्ला यांना मंडळासमोर बोलविण्यांत आले व त्यास त्यांनी निविदेत दिलेला दर हा जास्त वाटतो व तो कमी करावा असे मंडळाने सुचविले.

मे. लुत्फुल्ला यांनी सांगितले की, निविदेत दिलेला दर हा योग्य असा आहे. यावर मंडळाने संबंधीत ठेकेदारास आणखी दर कमी करण्याचे सुचविले त्यावर संबंधीत ठेकेदाराने सांगितले की, मंडळाच्या विनंतीनुसार निविदेतील नमुद दर ६०% जादा हा कमी करुन ५९.६०% जादा या दराने काम करण्यास तयार आहे.

यावर सदस्य ॲड. श्री. सेठी यांनी असे सुचविले की, ठेकेदार आणखी दर कमी करु शकतो काय ? याबाबत मा. सभापती, सदस्य श्री. नंदु कुलकर्णी व मुख्याधिकारी यांनी ठेकेदाराशी चर्चा करावी व दर निश्चित करावा. सदर निश्चित केलेल्या दराने ठेकेदारास काम वाटप करावे असे प्रतिपादन केले. यावर सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्व संमतीने वरील प्रस्तावास सहमती दिली व सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२२

मे. लुत्फुल्ला नांदेड यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जीनगर कौठा नांदेड येथील ६० अल्प उत्पन्न गट गाळ्यासाठी दाखल केलेली निविदा वाटाघाटीनंतर दिलेल्या दर ५९.६०% किंवा सभापती, प्रा. नंदु कुलकर्णी व मुख्याधिकारी यांच्या समोर होणाऱ्या वाटाघाटीनंतर येणाऱ्या दरावर निविदा मंजूर करण्यांत येत आहे. या ठरावाची स्थायी करण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

विषय क्र. ४: मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांचे परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

[१] औरंगाबाद मंडळाने एन-९, आर-२७ सिडको नविन औरंगाबाद येथे बांधलेल्या मध्यम उत्पन्न गट योजनेतील ८८ गाळे व गृहनिर्माण भवनाजवळील २४/१६ उच्च उत्पन्न गट योजनेतील गाळ्याबाबत.

या विषयावरील बाब टिप्पणीतील माहिती मंडळासमोर विषद करतांना सभापती यांनी नमुद केले की, वरील योजनेतील कांही गाळे मागणी

अभावी अद्यापही रिक्त आहेत व यांत मंडळाचा निधी अडकून पडलेला आहे. तसेच हे गाळे ब-याच दिवसापासून रिक्त असल्यामुळे आजपावेतो गाळ्यांच्या किंमतीत व्याजाच्या होणा-या भांडवलीकरणामुळे फार मोठी वाढ होत आहे. वाढीव किंमती जनतेस परवडत नाहीत. वारंवार गाळ्यांची जाहिरात देऊनही त्यास मागणी येत नाही. तसेच रिक्त असलेल्या गाळ्यांची नासधुसही होत आहे. त्यामुळे ही बाब मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यांत येत आहे असेही मिळकत व्यवस्थापक यांनी सांगितले.

यावर मंडळाचे मा. सभापती व मा. सदस्य श्री. सेठी यांनी सूचना केली की, रिक्त असलेल्या वरील योजनेतील गाळ्यांना मागणी यावी म्हणून मुळ आपडीपी घेऊन लाभधारकांना घरांचा ताबा द्यावा व व्याजाच्या भांडवलीकरणाच्या रक्कमेचा भरणा करण्यासाठी हप्ते पाडून द्यावेत जेणे करून गाळ्यांना मागणी मिळू शकेल ही प्रक्रिया अंमलात आणण्यात यावी अशी सूचना मा. सभापती व मा. सदस्य श्री. सेठी यांनी केली.

या चर्चेच्या अनुषंगाने मंडळाच्या सदस्या श्रीमती तुल्ले यांनी प्रतिपादन केले की, पोलीस अधिक्षक जालना यांनी त्यांच्या पोलीस कर्मचा-यासाठी मंडळाचे जालना येथील प्लॉट देण्याविषयी मागणी केली आहे व त्यांनी त्याबाबत काही माहिती मंडळाकडून मागविली आहे. तसेच श्रीमती तुल्ले यांनी असेही प्रस्तावित केले की, जालना येथील प्लॉट ब-याच वर्षापासून विक्री होत नसल्यामुळे सुरुवातीस अनामत रक्कम रु. ३०००/- घेऊन उर्वरीत रक्कम सुलभ हप्त्यामध्ये घेण्यांत यावी.

यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, जालना येथील भूखंड प्रथम येईल त्यास प्रथम भूखंड या तत्वावर उपलब्ध आहेत. पोलीस खात्यातील कर्मचा-यांनी वैयक्तीक अर्ज केल्यास त्यांना नियमाप्रमाणे भूखंड वाटप करता येतील असे प्रतिपादन केले.

मा. सभापती यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, जालना येथेही मंडळाचे जवळपास ३५० भूखंड मागणी अभावी पडून आहेत. प्रथम येईल त्यास प्रथम भूखंड या तत्वावर जाहिरात चालु असली तरी, या योजनेची सविस्तर माहिती पोलीस अधिक्षक जालना यांना कळवावी म्हणजे कदाचीत पोलीस कर्मचा-यांकडूनही या भूखंडास मागणी मिळू शकेल व भूखंड विकले जातील. याबाबत माहिती कळवितांना अर्जासोबत रु. ३०००/- भरणेसाठी कळविल्यास व उर्वरीत रक्कम किफायतशीर हप्त्यात वसुल करण्याची सवलत दि[illegible]स व अशी जाहिरात वर्तमान पत्रातही दिल्यास जालना

येथील रिक्त असलेल्या भूखंडास मागणी मिळू शकेल. असे मा. सभापती/औ. मं. यांनी मत व्यक्त केले.

मा. सभापती औरंगाबाद मंडळ, यांनी बैठकीत सूचना केली की, तिसगांव येथीलही गाळ्यांच्या किंमतीत व्याजाच्या भांडवलीकरणामुळे वाढ होत असल्यामुळे व त्यामुळे या गाळ्यासाठीही मागणी येत नाही. त्यामुळे म्हाडाचा फार मोठा निधी या गाळ्यात अडकुन पडलेला आहे. म्हणून तीसगांव येथील गाळे विक्रीच्या ... सुरुवातीच्या जाहिरातीत नमुद केलेली आयडीयी रक्कम घेण्यांत यावी व व्याजाच्या भांडवलीकरणामुळे वाढलेली रक्कम किफायतशीरपणे हप्त्यात व्याजासह वसुल करण्यांत यावी जेणे करुन हे रिक्त गाळे विक्री होऊ शकतील असे मा. सभापती यांनी मत व्यक्त केले.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६२३</u>

औरंगाबाद मंडळाने एन-९, आर-२७ सिडको येथे बांधलेल्या गाळ्यापैकी ८८ गाळे मध्यम उत्पन्न गट, २४/१६ गाळे उच्च उत्पन्न गट, २४ गाळे तिसगांव उच्च उत्पन्न गट योजनेतील रिक्त असलेले गाळे वाटप करण्यासाठी सुरुवातीस भरावयाची आयडीयी [गाळे वाटप दिनांकाच्या वेळीची] घेऊन मध्यंतरीच्या काळात व्याजाच्या भांडवलीकरणामुळे वाढलेली रक्कम तीन महिन्याच्या चार समान हप्त्यात व्याजासह वसुल करण्याच्या अटीवर गाळे वाटपासाठी जाहिरात द्यावी.

२] जालना येथील रिक्त असलेले भूखंड पोलीस अधिक्षक जालना कार्यालयातील पोलीस कर्मचाऱ्यांना देण्याविषयीची सविस्तर माहिती पाठविण्यांत यावी. तसेच भूखंड वाटपासाठी जाहिरात देऊन अर्जासोबत रु. ३०००/- घ्यावे व उर्वरीत भूखंडाची किंमत दोन महिण्याच्या अंतराने ३ हप्त्यात व्याजासह वसुल करावी.

वरील निर्णय हा प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन घेण्यांत आलेला आहे. त्यामुळे प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे पाठवावा.

विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या प्रत्येक बैठकीत अनाधिकृत बांधकाम व सरचार्ज या विषयावरच नेहमी चर्चा होते वत्याची सविस्तर माहिती मंडळासमोर येत नाही. तेंव्हा सरचार्ज बाबतची सर्व वसाहतीची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी.

शेवटी मुख्याधिकारी श्री. जावळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व राष्ट्रगीतानंतर मा. सभापतींच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

• ....